# गिरगाव हाइट्स आकाराला येणार

## मेट्रो-3 प्रकल्पग्रस्तांसाठी ४८ मजली टॉवर

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ भूमिगत मार्गिकेमधील गिरगाव आणि काळबादेवी येथे शंभराहून अधिक वर्षांपासून राहणाऱ्या ७३४ प्रकल्पग्रस्त कुटुंबीयांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) गिरगाव मेट्रो स्थानकाजवळ ४८ मजली इमारत बनवण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली असून, या प्रकल्पासाठी ३९५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

या कुटुंबांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी व्हावे अशी स्थानिकांची आग्रही मागणी होती. त्यामुळे हा पुनर्वसन प्रकल्प रखडला होता. मात्र, एमएमआरसीने या प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवला असून काळबादेवी हाइट्स (के-३), गिरगाव हाइट्स (जी-२) आणि काळबादेवी व्यावसायिक केंद्र असा एकात्मिक विकास करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. काळबादेवी हाइट्स (के-३) इमारतीचे कंत्राट यापूर्वीच देण्यात आले आहे. तर गिरगाव हाइट्स (जी-२) या इमारतीसाठी निविदा जारी करण्यात आल्या आहेत. इच्छुक विकासकांना ९ जूनपर्यंत निविदा सादर करण्यासाठी


इमारतीचे संकल्पचित्र

मुदत आहे. या ४८ मजली इमारतीमध्ये ३६९ घरे तर १५६ दुकाने बांधण्यात येणार आहेत. यासाठी २१ मे रोजी निविदापूर्व बैठक आयोजित करण्यात आली आहे. तसेच निविदांशी संबंधित सर्व सविस्तर माहिती एमएमआरसीने आपल्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिली आहे.

मुंबई महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत सहा भूखंड एकत्रित क्लस्टर म्हणून विकसित केले जात आहेत. यापैकी के-१, के-३, जी-३ या तीन भूखंडांवर रहिवाशांसाठी पुनर्वसन योजना राबवली जाईल. अन्य तीन भूखंड मेट्रोसंबंधित कामांसाठी उपयोगात आणले जातील अशी माहिती एमएमआरसीतील एका अधिकाऱ्याने दिली.